**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतीय हवाई दलाचा ९१वा वर्धापनदिन साजरा / हवाई दलाच्या नव्या बोधचिन्हाचं अनावरण
- इस्रायलवरच्या हमास हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, आज संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची विशेष बैठक
- अफगाणिस्तानात हेरातजवळ झालेल्या शक्तिशाली भूकंपात मृतांची संख्या दोन हजाराच्या वर
- कर्नाटकात अत्तिबेळे इथं फटाक्याच्या दुकानाला लागलेल्या आगीत १४ जणांचा होरपळून मृत्यू
- हाँगझू आशियाई क्रीडास्पर्धांचा आज समारोप

  **आणि**
- एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा पहिला सामना चेन्नईत ऑस्ट्रेलियाबरोबर रंगणार

**<><><><><>**

भारतीय हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापन दिनाचा मुख्य सोहळा  आज उत्तर प्रदेशात प्रयागराजच्या बमरौली तळावर झाला. हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल व्ही.आर. चौधरी यांनी यानिमित्त आयोजित संचलनाची पाहणी केली. संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान आणि इतर मान्यवरही यावेळी उपस्थित होते.

यावेळी एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी हवाई दलाच्या नव्या बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण केलं. यावेळी जुना बोधचिन्हांकीत ध्वज सन्मानपूर्वक उतरवून हवाई दलप्रमुखांकडे सुपूर्द केला गेला. आता हा जुना

बोधचिन्हांकीत ध्वज हवाईदलाच्या वस्तुसंग्रहालयात ठेवला जाणार आहे. यंदाची हवाई दलाची संकल्पना “हवाई ताकद - सीमापार” अशी आहे.

यापुढे युद्ध जिंकणं तसंच शांतता राखण्याच्या दृष्टीने जगभरातल्या हवाई दलांच्या क्षमतांमध्ये होत असलेली वाढ आणि त्याच्या परिणामकारतेचे बारकावे आपण समजून घेण्याची गरज एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी यावेळी व्यक्त केली.

मुंबईतही यानिमित्तानं आयोजित केलेल्या समारंभाला राज्यपाल रमेश बैस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हवाई दल केवळ आकाशातून संरक्षण करत नाही तर देशाच्या कोणत्याही भागाला नैसर्गिक आपत्तीचा तडाखा बसला तर तात्काळ धावून जातं, असं एअर व्हाईस मार्शल रजत मोहन यांनी सांगितलं. आत्मनिर्भर होण्याला तसंच अग्निविरांच्या भरतीला हवाई दलाचं प्राधान्य असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापनदिनानिमीत्त राष्ट्रपती, प्रधानमंत्री, संरक्षणमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्र्यांनी भारतीय हवाई दलाचे सर्व जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

भारतीय हवाई दल नेहमीच नवी उंची गाठत असून, ते केवळ देशाच्या हवाई सीमांचं रक्षण करण्यासाठीच नाही, तर मानवतावादी मदतीसाठी सदैव तत्पर असतं, त्यांच्या कार्याला आपण सलाम करतो असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

भारतीय हवाई दलाचं शौर्य, त्यांची बांधिलकी आणि समर्पणवृत्तीचा देशाला अभिमान असून, त्यांची सेवा आणि त्यागामुळे देशाचं आकाश सुरक्षित असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

देशाच्या सुरक्षेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या भारतीय हवाई दलाचा आपल्याला अभिमान असून, हवाई दल ही देशाची कणखर शक्ती आहे असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

भारतीय हवाई दलानं आपल्या पोलादी पंख आणि धाडसाच्या जोरावर युद्ध आणि शांततेच्या काळात देशाच्या हिताचं रक्षण केलं, त्यांच्या अनमोल सेवेचं आणि बलिदानाचं आपण स्मरण करतो असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

हमास या दहशतवादी संघटनेनं इस्रायलवर केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, आज आखाती देशांमधल्या परिस्थितीच्या मुद्यावर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची विशेष बैठक होणार आहे.

दरम्यान पॅलेस्टिनी दहशतवादी संघटना हमासनं केलेल्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरात इस्रायलच्या संरक्षण दलांनी स्वॉर्ड्स ऑफ आयर्न ही मोहीम सुरु केली आहे. या मोहीमेअंतर्गत इस्रायलनं गाझा पट्ट्यातल्या हमासच्या ताब्यातल्या १७ लष्करी छावण्या आणि चार केंद्रांवर हल्ले केले, यात २३० पेक्षा अधिक जण ठार झाल्याचं वृत्त आहे. त्याआधी हमासनं इस्रायलवर आधी रॉकेटचा मारा करत आणि नंतर गाझा पट्टीतून इस्रायलच्या शहरांमध्ये घुसखोरी करत केलेल्या हल्ल्यात तीनशेहून अधिक लोक ठार तर दीड हजारापेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हमासनं केलेल्या हल्ल्याचा निषेध करत इस्रायलला पाठिंबा व्यक्त केला आहे. इस्रायलच्या भारतातल्या दूतावासानंही या पाठिंब्याबद्दल भारताचे आभार मानले आहेत.

या हल्ल्यानंतर पॅलेस्टीनमधल्या भारतीय प्रतिनिधी कार्यालयानं रामल्ला इथल्या भारतीयांना आपत्कालीन स्थितीत थेट संपर्क करावा असं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

आगामी काही वर्षात भारताची अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर अव्वल स्थानावर येणार आहेच, पण त्यावेळी त्यातील गुणवत्ता आणि सर्वसमावेशकता कायम राखण्याचं मोठं आव्हान युवकांसमोर राहणार असल्याचं प्रतिपादन केंद्रीय शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री धर्मेंद्र प्रधान यानी काल पुण्यात केलं. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाच्या २९ व्या वार्षिक दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यावेळी उपस्थित होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून पुणे हे शिक्षण आणि सामाजिक सुधारणेचं प्रमुख केंद्र राहिलं असून देशाच्या आर्थिक विकासाच्या आरखड्यात या गोखले अर्थशास्त्र संस्थेचं योगदान फार मोलाचं राहिले आहे, असं प्रधान म्हणाले. सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या वतीने पुण्याच्या विमाननगर भागात उभारण्यात आलेल्या 'ईशान्य भवन' या वास्तूचं उद्घाटन धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते करण्यात आलं.

**<><><><><>**

लडाखमध्ये लडाख स्वायत्त हिल विकास परिषदेच्या पाचव्या निवडणुकीसाठी आज सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणी सुरू झाली आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर लडाखमध्ये ही पहिली निवडणूक होत आहे. त्याआधी कारगिलमध्ये ४ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या निवडणुकीत ७७ पूर्णांक ६ दशांश टक्के टक्के मतदान झालं होतं. या निवडणुकीत विविध राजकीय पक्षाचे एकूण ८५ उमेदवार उभे आहेत.

<><><><><>

अफगाणिस्तानात इराणच्या सीमेलगतच्या भागात शक्तिशाली भूकंपात मृत्यू झालेल्यांची संख्या दोन हजाराच्या वर गेली आहे. स्थानिक वेळेनुसार काल सकाळी अकरा वाजता पश्चिमेकडील हेरात शहरापासून ४० किलोमीटर अंतरावर सहा पूर्णांक तीन रिख्टर क्षमतेचा हा भूकंपाचा धक्का बसला त्यापाठोपाठ आणखी तीनवेळा जोरदार हादरे बसले. यामध्ये अनेक इमारतींचं नुकसान झालं, असून अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. या परिसरात सुमारे १९ लाख लोकवस्ती असल्याची माहिती जागतिक बँकेच्या आकडेवारीत दिली आहे. मदतकार्य सुरु असून मृतांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याचं स्थानिक प्रशासनाने सांगितलं. जागतिक आरोग्यसंघटनेच्या सहकार्याने रुग्णवाहिका उपलब्ध झाल्या असून जखमींना बाहेर काढण्यात येत आहे.

<><><><><>

कर्नाटकात अत्तिबेळे इथं काल एका फटाक्याच्या दुकानाला लागलेल्या आगीत १४ जणांचा होरपळून मृत्यू झाला . आग लागली तेव्हा या दुकानात ३५ जण काम करत होते. दुकानमालकासह चार जण या दुर्घटनेत जखमी झाले आहेत. सहा वाहनंही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली, त्यात फटाक्यांनी भरलेल्या एका

ट्रकचा समावेश आहे. दुपारी साडे तीनच्या सुमारास लागलेली ही आग अग्निशामक दलाच्या ९ बंबांनी रात्री साडे आठ वाजेपर्यंत आटोक्यात आणली.

<><><><><>

सिक्कीममध्ये तिस्ता नदीच्या खोऱ्यात आलेल्या पुरातल्या मृत्यूंची संख्या ३२ वर पोहोचली आहे. यात भारतीय सैन्याच्या ९ जवानांचाही समावेश आहे. अद्याप २२१ जण बेपत्ता असल्याची माहिती सिक्कीमच्या राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं दिली आहे. आतापर्यंत पुराच्या तडाख्यात सापडलेल्या २ हजार ५६३ जणांची यशस्वी सुटका केली असून, तर भारत- तिबेट सीमा पोलीसांना चुंगथांग येथील सिक्कीम ऊर्जा लिमिटेड धरणाच्या बोगद्यात अटकलेल्या ६ जणांना वाचवण्यात यश आलं. सध्या ३० मदत छावण्यांमध्ये ७ हजार २५ लोकांनी आश्रय घेतला असल्याचंही प्राधिकरणानं कळवलं आहे. या पुरामुळे १३ पूल वाहून गेले तर १ हजार ३२० घरांचं मोठं नुकसान झालं.

दरम्यान या पूरपरिस्थितीवर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग यांच्या शासकीय निवासस्थानी आज आज केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय कुमार मिश्रा यांच्यासोबत बैठक झाली. यावेळी तमांग यांनी पूरबाधीत क्षेत्राला दिलेल्या भेटींविषयी तसंच तिथे सुरू असलेल्या बचाव आणि मदत कार्याची माहिती मिश्रा यांना दिली, तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र सरकारनं तातडीनं प्रतिसाद दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

या क्षेत्रातली परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी केंद्र सरकार राज्याला आवश्यक ती सर्व मदत करेल अशी ग्वाही मिश्रा यांनी यावेळी दिली.

<><><><><>

हाँगझू आशियाई क्रीडास्पर्धांचा समारोप आज होणार आहे. भारतीय खेळाडूंनी "इस बार १०० पार" च्या वचनबद्धतेनुसार आपली मोहीम पूर्ण केली आणि २८ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४१ कास्यअशी १०७ पदकांची विक्रमी कामगिरी केली. २०१८च्या जकार्ता आशियाई क्रीडा स्पर्धेतभारतीय खेळाडूंना एकंदर ७० पदक मिळाली होती. ऑलिम्पिक्स, राष्ट्रकुल आणि आशियाई खेळ या तीन प्रमुख खेळांपैकी कोणत्याही स्पर्धेत भारतानं १०० हून अधिक पदके जिंकण्याची ही दुसरी वेळ आहे. २०१० मध्ये नवी दिल्ली इथं झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धांध्ये त्यांनी १०१ पदकं जिंकली होती. भारताच्या पदक स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी काल भारतीय खेळाडूंनी एकंदर १२ पदकं मिळवली, त्यापैकी निम्मी सुवर्णपदके कबड्डी, बॅडमिंटन, हॉकी आणि तिरंदाजी या क्रीडा स्पर्धांमध्ये आहेत. भारतीय खेळाडू आणि नेमबाज हे आशियाई क्रीडा स्पर्धेत सर्वात यशस्वी ठरले. ॲथलेटिक्सने भारताला सर्वाधिक २९ पदकं मिळवून दिली. दुसरीकडे, भारतीय नेमबाजांनी देशासाठी एकंदर २२ पदकं जिंकून दिली. आशियाई क्रीडा स्पर्धेत शंभरहून अधिक पदकं जिंकल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी सर्व खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे. पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानावर आहे. या स्पर्धेचा समारोप भारतीय वेळेनुसार आज संध्याकाळी साडे पाच वाजता होणार आहे. या कार्यक्रमात भारताचा ध्वज हॉकीपटू पी आर श्रीजेश धारण करणार आहे.

**<><><><><>**

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा पहिला सामना आज ऑस्ट्रेलियाविरुद्ध चेन्नईत होणार आहे. हा सामना २ वाजता चेन्नईत सुरू होईल. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

विश्वचषक स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात बांग्लादेशानं अफगाणिस्तानला ६ गडी राखून पराभूत केलं. १५७ धावांचं लक्ष्य बांग्लादेशानं ३५ व्या षटकात गाठलं. दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं ४२८ धावसंख्या उभारून विश्वचषक स्पर्धेतला विक्रम नोंदवला आणि प्रतिस्पर्धी श्रीलंकेचा १०२ धावांनी पराभव केला.

**<><><><><>**